**नवी मुंबई महानगरपालिका**

महापालिका सचिव कार्यालय,
बेलापूर भवन, ८ वा मजला,
सी.बी.डी., बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक ०६ जानेवारी २०१४.

**निवेदन पत्रिका**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, **महानगरपालिकेची जानेवारी २०१४ ची दुसरी सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे भरेल.

२. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, जानेवारी २०१४ महिन्याच्या **दुसऱ्या** सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४४ अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त ५ (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त ३ (तीन) ) महापालिका सचिव** यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

| | | |
|---|---|---|
| १. ठरावाच्या सूचना. | : | गुरुवार, दि. ०९ जानेवारी २०१४ पर्यंत. |
| २. महाराष्ट्र म.अधि.कलम ४४ अन्वये विचारावयाचे प्रश्न. | : | शुक्रवार, दि. १० जानेवारी २०१४ पर्यंत. |

**मा.महापौरांच्या आदेशावरुन,**

सही/-
**(चित्रा बाविस्कर )**
**महापालिका सचिव (प्र),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**